# जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचे समोरील कामकाज

---

**विषयः-** कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक
उपाययोजना करणेकामी आदेश.
सी.आर.पी.सी 144 प्रमाणे आदेश लागू करणेबाबत

**वाचलेः-** 1.फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
2.सार्वजिनक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.कोरोना 2020/ प्रक्र.58/आरोग्य5 दि.13/03/2020, दि.14/03/2020 दि.15/03/2020
3. साथरोग अधिनियम 1897
4. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005
5. गृह सचिव, भारत सरकार यांचेकडील आदेश No.40-3/2020-DM-I(A) दि.14/04/2020
6.याकार्यालयाकडील आदेश क्र.डिसी/कार्या9ब1/842/2020 दि.30/03/2020
7.महाराष्ट्र शासन अधिसुचना NO: DMU/2020/CR.92/Dism-1, दि.13/04/2020
8. याकार्यालयाकडील आदेश क्र.डिसी/कार्या9ब1/855/2020 दि.14/04/2020
9. महाराष्ट्र शासन अधिसुचना NO: DMU/2020/CR.92/Dism-1, दि. 14/04/2020 व दि.15/04/2020

---

क्र.डि.सी./कार्या9ब1/856/2020 **दुरुस्ती आदेश** अहमदनगर, दि. 15 /04/2020

---

ज्याअर्थी, कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सी.आर.पी.सी. 144 अन्वये उक्त संदर्भ क्र.8 अन्वये या कार्यालयाकडून आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, लॉकडाऊनच्या तत्वाचे पालन करणेसाठी नागरिकांनी वारंवार पेट्रोल व डिझेल भरण्याचे कारण सांगुन घरा बाहेर पडू नये व लॉकडाऊनच्या तत्वाचे उल्लंघन होऊ नये, म्हणुन डिझेल व पेट्रोल विक्रीच्या वेळ अत्यावश्यक सेवावर आणि ग्रामीण भागात राहणारे शेतकरी यांचे शेतीचे कामावर कुठल्याही प्रकारचे दुष्परिणाम न होता सीमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्र.8 मधील आदेशातील मुद्दा क्र.7 नुसार
" **7.पेट्रोल पंप-** सर्व खाजगी दुचाकी, खाजगी तीनचाकी व खाजगी चार चाकी वाहनांसाठी पेट्रोल विक्री पूर्णतः बंद करण्यात येत आहे. (शासकीय वाहने, अम्बुलन्स व वैद्यकिय सेवा देणारे डॉक्टर्स व परिचारीका व वैद्यकीय सेवेशी निगडीत कर्मचारी यांना ओळखपत्र तपासुन सकाळी 5.00 ते सकाळी 9.00 वाजेपर्यंत पेट्रोल विक्री करण्यात यावी)" याचे ऐवजी असे वाचावे
***"अहमदनगर जिल्ह्याच्या महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये पेट्रोल विक्रीची वेळ दररोज सकाळी 5.00 ते सकाळी 9.00 वाजे पर्यत निश्चित करण्यात येते आहे."***

व **डिझेल विक्री-** दररोज सकाळी 5.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत." ऐवजी असे वाचावे
***"अहमदनगर जिल्ह्याच्या महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये डिझेल विक्रीची वेळ दररोज सकाळी 5.00 ते दुपारी 12.00 वाजे पर्यत निश्चित करण्यात येते आहे."***

तसेच संदर्भ क्र.8 मध्ये नमूद आदेशाचा कालावधी हा 30/04/2020 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत नमूद करण्यात आला होता. तरी संदर्भ क्र.9 अन्वये महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या अधिसुचनेप्रमाणे संदर्भ क्र. 8 मधील आदेश तसेच याआदेशामध्ये झालेली सुधारणा ( दि.15/04/2020 चे सुधारित आदेश धरुन)
**दि.03/05/2020 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत लागू राहील.**

कोणतीही व्यक्ती/ संस्था/ संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड विधान संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशिर कारवाईस व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

जिल्हा दंडाधिकारी अहमदनगर

स्वाक्षरित/-

(राहुल द्विवेदी)

जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर

प्रतः- मा.प्रधानसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतः- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग मंत्रालय मुंबई-32 यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रतः- मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रतः- पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित

प्रतः- आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) जिल्हा अहमदनगर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) जिल्हा अहमदनगर व उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत) जिल्हा अहमदनगर

प्रतः- जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीस्तव.

प्रतः- जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर

2/-सदर आदेशाची स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.

(राहुल द्विवेदी)

जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर